Vol 3 Issue 3 Dec 2013

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

*Review Of Research*
Vol. 3, Issue. 3, Dec. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net

**ORIGINAL ARTICLE**

# इंग्रजी शासनांतर्गत विदर्भातील स्त्री शिक्षणविषयक प्रारंभिक प्रयत्न (इस 1854 ते इस 1895)

*सुनिता सरायकर , अभिलाषा दि. राऊत*

इतिहास विभागप्रमुखसहा. प्राध्यापिका,वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था,हिस्लॉप महाविद्यालय,नागपूर

***सारांश :***

विदर्भात स्त्रियांच्या आधुनिक शिक्षणाचा पाया खऱ्या अर्थाने ब्रिटिशांच्या राजवटीत घातला गेला. इस. 1861 मध्ये शिक्षणाखात्याची सुरूवात करण्यात आली आणि विदर्भात क्रमबद्ध शिक्षणपद्धतीस प्रारंभ झाला. 19 व्या शतकात संपूर्ण भारतात प्रबोधनाचे वारे वाहू लागले. या प्रबोधनकाळात स्त्री शिक्षणाचा प्रश्न प्रामुख्याने हाताळता गेला. भारत व महाराष्ट्राच्या विविध भागात वाहणारे हे प्रबोधनाचे वारे विदर्भातही आले. मुंबई–पुण्याकडील सुशिक्षित मंडळी येथे वास्तव्यास येवू लागली. विदर्भात हळूहळू जनजागृती होवून स्त्री शिक्षणाच्या विकासाच्या दृष्टिने ब्रिटिशशासन, खिस्ती धर्माधिकारी, येथील सुधारक व स्त्रिया यांच्या प्रयत्नाने स्त्री शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. सुरवातीस घरीच मुलींना शिकविले जात असे. परंतु पुढे मुलींसाठी शाळा काढायच्या तर स्त्री शिक्षिकांची आवश्यकता वाटून त्यासाठी प्रयत्न करण्यात आले. शासन व स्थानिक लोकांच्या पुढाकाराने विदर्भात 19 व्या शतकाच्या शेवटच्या दशकांपासून स्त्री शिक्षणविषयक कार्याने वेग धरला व हळूहळू विदर्भाच्या विविध भागात स्त्री शिक्षणविषयक कार्य केले गेले.

## *प्रस्तावना :*

बंगालमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापनाझाल्यावर नागपूरकर भोसल्यांचा इंग्रजांशी संबंध आला. कापसाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या विदर्भाचे आर्थिक, राजकीय व लष्करी महत्व इंग्रजांनी ओळखले होते. त्यामुळे या प्रांतावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी प्रारंभापासूनच इंग्रज प्रयत्नशील होते. त्यासाठी त्यांनी जानोजी भोसलेच्या कारकीर्दीपासून इंग्रज वकील नागपूरच्या दरबारात पाठविण्यास प्रारंभ केला. इस 1854 मध्ये नागपूरचे भोसल्यांचे राज्य खालसा झाल्यांनंतर खऱ्या अर्थाने विदर्भात इंग्रजी अंमल सुरू झाला.

## *इस 1854 पूर्वी विदर्भातील स्त्री शिक्षणाची स्थिती :–*

भारतातील इतर प्रांतातील स्त्रियांप्रमाणेच विदर्भातील स्त्रियांचे सामाजिक जीवन चार भिंतीत बंदिस्त होते. भोसलेकालीन हिंदू व मुसलमान दोन्ही समाजातील मुलींवर लहानपणापासूनच कडक सामाजिक बंधने लादली जात. त्यामुळे त्यांच्या शिक्षणात अनेक अडचणी येत. स्त्रियांच्या शिक्षणाची स्थिती असमाधानकारक असण्यामागे अनेक सामाजिक व आर्थिक कारणे होती. पडदा पद्धती, बालविवाह, सती, समाजातील वृद्ध स्त्रिया व पुरूष यांचा मुलींच्या शिक्षणाप्रती असलेला प्रतिकूल दृष्टिकोण, मुलींसाठी शाळांचा व शिक्षिकांचा अभाव ही अशी कारणे होती की ज्यामुळे इस 1854 पूर्वी स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढू शकले नाही. मुलींना केवळ लिहिणे, वाचने व हिशोब एवढेच प्रारंभिक स्वरूपाचे शिक्षण दिले जात असे. भोसले राजांनीही शिक्षणाच्या क्षेत्रात विशेष आवड दाखविली नाही.

विदर्भातील मराठा मंडळी आपल्या मुलींना शाळेत पाठविण्यास फारसे उत्सुक नव्हते. ही मंडळी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था फारच क्वचित करत. त्यामुळे त्यांच्याकडून मुलींच्या शिक्षणाची अपेक्षा ठेवणे शक्य नव्हते. ग्रामिण भागात निरक्षरतेचे प्रमाण जास्त होते. विदर्भातील शेतकरी समाज हा आपल्या मुलांना शाळेत पाठविण्यास फारसा उत्सुक नव्हता. बाजारभाव समजण्या इतपत गणित, आकडेमोड व हिशोब त्यांच्या मुलांना आले तरी ते त्यावरच समाधान मानीत.

भोसल्यांच्या राज्यांप्रमाणेच निजामाच्या अधिकार क्षेत्रातील वऱ्हाडातील स्त्री शिक्षणाची स्थिती असमाधानकारक होती. या भागात पुरूष फारसे शिकलेले नव्हते. त्यामुळे त्यांच्या मुली आणि बायका शिकल्यास

त्यांच्यासाठी उपयोगाचे ठरू शकते हे त्यांना समजाविणे शक्य नव्हते. परंतु समाजात असेही काही मोजके प्रतिष्ठित व प्रभावी लोक होते कि ज्यांना आपल्या मुलींना शिकविण्याची इच्छा होती, परंतु ते आपल्या मुलींना शाळेत पाठवू इच्छित नव्हते कारण शाळेत पुरूष शिक्षक शिकवित.

एकुणच इस 1854 पूर्वी वैदर्भीय समाजात स्त्री शिक्षणविषयक स्थिती फारशी उत्साहवर्धक नव्हती, स्त्री निरक्षरतेचे प्रमाण अधिक होते. शासकवर्गाने स्त्री शिक्षणविषयक कार्यात विशेष आवड न दाखविल्यामुळे सर्वसाधारण समाजही स्त्री शिक्षणाच्या बाबतीत उदासीन राहिला.

### *विदर्भात इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ :–*

इस 1854 हे वर्ष विदर्भाच्या इतिहासात महत्वाचे आहे. या वर्षी विदर्भातील भोसले राजवटीचा अस्त झाला व इंग्रजी राजवटीचा उदय झाला. इस 1854 लाच वुडचा शिक्षण विषयक खालिता प्रसिद्ध करण्यात आला व या द्वारे इंग्रज शासनाने स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. भोसलेंची राजवट संपुष्टात आल्यानंतर इस 1861 मध्ये इंग्रजांच्या नियंत्रणाखाली मध्यप्रांताची ;ब्मदजतंस च्तवअपदबमद्ध निर्मिती करण्यात आली. मध्यप्रांतात सुरवातीस त्याच्या शेजारी असलेल्या मद्रास, मुंबई, बंगाल व पश्चिमोत्तर प्रांत या भागांमध्ये अस्तित्वात असलेली शिक्षणव्यवस्था स्वीकारण्यात आली (1). गावातील अशा व्यक्ती ज्यांना लोक स्वतःहून शिक्षक म्हणून निवडतील आणि त्यांच्या कार्यासाठी मदत करतील, अशा व्यक्तींचा उपयोग शिक्षणकार्यासाठी मध्यप्रांतात करण्यावर थॉमसनने अधिक भर दिला होता (2). सुरवातीस अस्तित्वात असलेल्या शाळा व त्यासाठी प्रयत्न करणारे लोक यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण इंग्रज शासनाद्वारे राबवण्यात आले.

पुढे वुडच्या खालित्यात सांगितल्या प्रमाणे इस 1861 मध्ये मध्यप्रांतात प्रांतीय शिक्षण विभागाची स्थापना करण्यात आली. सर्व प्रकारच्या शैक्षणिक कार्यांचे प्रशासन चालविण्याचे व शैक्षणिक क्षेत्रात सल्ला देण्याचे कार्य ह्या विभागाकडे सोपविण्यात आले (3). अशाप्रकारे विदर्भात पहिल्यांदाच इंग्रजी शासनांतर्गत शिक्षण विभागणी स्थापना करण्यात आली व शिक्षणाची जबाबदारी शासनाद्वारे स्वीकारण्यात येवून विदर्भात क्रमबद्ध आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ झाला. शासनाद्वारे शाळा उघडणे, त्या चालविणे शाळांना अनुदान देणे, परीक्षा घेणे, शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजी भाषेचा उपयोग इ. सर्व नवीन बाबींची सुरवात शिक्षणक्षेत्रात विदर्भात इंग्रजांनी केली. गरीब प्रजा, भाषेची अडचण, निधीचा अभाव, इंग्रजांप्रति स्थानिक जनतेची प्रतिकूल भावना अशा अडचणी असतांनाही शिक्षण विभागाद्वारे शिक्षणाच्या खाजगी प्रयत्नांना प्रोत्साहन देण्याचे कार्य सुरूच होते. नवीन शाळा सुरू करण्याऐवजी अस्तित्वात असलेल्या शाळांनाच प्रोत्साहन व अनुदान देण्याचे धोरण इंग्रजी शासनाद्वारे सुरवातीस राबविण्यात आले. अशाप्रकारे इस 1854 नंतरच विदर्भात आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ झाला.

### *इंग्रजांचे विदर्भातील स्त्री शिक्षणविषयक प्रारंभिक कार्य(इस 1854 ते इस 1895) :–*

भारतातील इतर प्रांताप्रमाणेच विदर्भातही स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य इंग्रजांनी हाती घेतले. तत्कालीन वैदर्भीय समाज हा मुलींच्या शिक्षणाच्या विरोधात होता. बालविवाह, सती, पडदा पद्धती, जातीभेद, अस्पृश्यास्पृश्य भेद अशा विविध सामाजिक परंपरा व रूढी स्त्रियांच्या शिक्षणात अडचणी उपस्थित करीत होत्या. परंतु तरीही इंग्रजांनी विदर्भात स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढण्याऐवजी प्रथम मुलींना शाळेत आणणे गरजेचे होते.

नागपूर विभागाचा तत्कालीन कमिश्नर एफ. वेनिंग याचे असे मत होते कि जर पुरूष मंडळी शिकली तर ते शिक्षित पत्नी व मुलींची अपेक्षा करतील (4). इंग्रजांनी प्रथम समाजातील उच्चवर्णीयांच्या मुलींना शिक्षित करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी ख्रिस्ती स्त्री स्वाध्वींची मदत घेतली. त्यानुसार कामठी येथील दोन ख्रिस्ती स्त्री स्वाध्वींनी समाजातील फक्त उच्चवर्णियांच्या मुलींसाठी नागपूरात शाळा सुरू करण्याचे स्वीकारले (5). यानंतर हळूहळू इंग्रजांनी विदर्भाच्या विविध भागात मुलींसाठी शासकीय शाळा काढायला सुरवात केली.इस. 1867 मध्ये अकोल्याला शासकीय कन्या शाळा सुरू करण्यात आली. ही वऱ्हाडातील पहिली कन्या शाळा होय (6).इस 1870–71 पर्यंत वऱ्हाडात मुलींच्या शाळांची संख्या 27 पर्यंत पोहोचली व त्यात 671 मुली शिकत होत्या (7). इस 1867 मध्ये नागपूर, रामटेक व उमरेड येथेही मुलींच्या शाळा सुरू करण्यात आल्या. वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट (1875), वर्धा (1878), चंद्रपूर जिल्ह्यात सिरोंचा (1876), भंडारा जिल्ह्यात भंडारा (1864) व पवनी (1868) इ. शासकीय मुलींच्या शाळा सुरू करण्यात आल्या (8).परंतु या शाळा सर्वच जातीच्या मुलींसाठी होत्या. समाजात त्यावेळी जातिभेद असल्यामुळे आपल्या मुलींना सर्वच जातीच्या मुलींबरोबर शिकावे लागेल, असे वाटून काही पालक सरकारी शाळांमध्ये मुलींना पाठवित नसत.

सुरवातीस विदर्भात स्त्री शिक्षिकांच्या प्रशिक्षणासाठी एकही शाळा नव्हती. बरेचदा मुलांच्या शाळेतील शिक्षकांच्या पत्नी या मुलींच्या शाळेचा कार्यभार सांभाळीत असत आणि त्या कार्यात यशस्वी ही होत. त्यामुळे भारतीय शिक्षण आयोगासमोर साक्ष देतांना नागपूरच्या नॉर्मल स्कूलचे हेडमास्टर श्री वामनराव कोल्हटकर आणि मध्यप्रांताच्या कमिश्नराचे सचिव एल. फ्रेजर यांनी असे सुचविले की मुलींच्या शाळेत शिक्षक पुरविण्याची सर्वात चांगली पद्धत म्हणजे

पती–पत्नी दोघांनाही शाळेत पाठवावे(9).1882 मध्ये हंटर आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे विदर्भात इंग्रज शासनाने सार्वजनिक निधीचा उपयोग मुलींच्या शिक्षणासाठी करण्याचे ठरविले. इतकेच नव्हे तर मुलींच्या शाळांसाठी अनुदानही वाढविण्यात आले. मुलींकडून शिक्षणशुल्क घेतले जात नसे. त्यांना शिष्यवृत्ती दिल्या जात असे. त्याचबरोबर स्त्री शिक्षणाला प्रभावी बनविण्यासाठी मुलींच्या शाळा स्थानिक संस्थांना हस्तांतरित करणे, स्त्री निरिक्षिकांची नियुक्ती करणे, स्थानिक व युरोपिय लोकांकडून सहकार्य मिळविणे इ. विविध उपाय सुरवातीस इंग्रज शासनाने अंमलात आणले. त्याचबरोबर हैद्राबाद रेसिडन्सी मध्ये वऱ्हाडचा सचिव असलेल्या डब्ल्यू. जे. कॅनिंगघम याने 7 जुलै 1884 रोजी भारत सरकारला मुलींच्या शिक्षणासाठी पुढील उपाय (10) सुचविले.

1.शैक्षणिक निधी स्त्री शिक्षणावर खर्च करावा.
2.मुलांच्या शिक्षणाप्रमाणे मुलींच्या शिक्षणाचा दर्जा उंचवावा.
3.मुंबई रेसिडन्सीतून स्त्री शिक्षिका आणाव्यात.
4.प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था अमरावती व अकोला नगर पालिकांकडे सोपवावी इ.

सुरवातीस सांस्कृतिक भिन्नता, समाजाचा रूढीवादी दृष्टिकोण, स्त्री शिक्षणाप्रती उदासीनता या अशा समस्या होत्या कि ज्यामुळे मुलींसाठी शाळा उघडणे किंवा त्यांना शिकविणे इंग्रजांना कठीण गेले. मुलींना शिकवायला स्त्री शिक्षिकांचा अभाव, स्त्रीयांसाठी उपयुक्त अभ्यासक्रमाचा अभाव, वसतीगृहाचा अभाव अशा अनेक अडचणींना इंग्रजांना सामोरे जावे लागले. इंग्रज शासन स्थानिक जागरूक जनता, संस्था इ. चा उपयोग स्त्री शिक्षणाच्या कार्यात करून घेवू इच्छित होते; परंतु स्थानिक लोक ही जबाबदारी घेण्यास पुढे येत नव्हते. असे असूनही इंग्रजांनी विदर्भात स्त्री शिक्षणाचे प्रारंभिक प्रयत्न चालूच ठेवले.

### *इंग्रजांचे स्त्री शिक्षणविषयक धोरण*

विदर्भात इंग्रजी शासन सुरू होण्यापूर्वी स्त्री शिक्षणाची स्थिती अत्यंत दयनीय होती. मुलींना शाळेत येण्यास प्रोत्साहन देण्यापासूनच इंग्रजांना स्त्री शिक्षणविषयक कार्याची सुरवात करावी लागली. त्याचबरोबर स्त्री शिक्षणविषयक धोरण राबवितांना शालेय इमारत, प्रशासन, अनुदान, शिक्षण शुल्क इ. विविध बाबींचा विचार करून निर्णय घ्यावयाचे होते. विदर्भातील जनता व केंद्र शासन यांच्या कडून प्राप्त होणाऱ्या आर्थिक सहाय्यावर इंग्रजांना त्यांची स्त्री शिक्षणाची उद्दिष्टे गाठावयाची होती.

### *शालेय प्रशासन :–*

इंग्रजांनी सुरवातीस मुलींसाठी ज्या शाळा सुरू केल्या त्यांचे यशहे इंग्रजांद्वारे त्या शाळांसाठी राबविण्यात आलेल्या प्रशासन व्यवस्थेवर अवलंबून होते. इंग्रजांनी विविध मार्गांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य केले. त्यांना मुलींसाठी अशा शाळा स्थापन करावयाच्या होत्या कि जेथे स्त्री शिक्षिका असतील व त्या शाळांचे निरीक्षण स्थानिक स्त्री निरीक्षिकांकडून करण्यातयेइल. ह्या उद्देशाची प्राप्ति पूर्णपणे लोकांच्या सहकार्यावर अवलंबून होती. काही शाळांचे निरक्षण कार्य पूर्णपणे स्त्री निरिक्षिकांकडे सोपविण्यात आले होते. त्यामुळे मुलींच्या माता मुलींना शाळेत पाठविण्यास उत्सुक होत्या. परंतु ग्रामीण भागात ग्रामिणांची इच्छा असल्याशिवाय मुलींची शाळा सुरू करणे निरर्थक होते. कार्यक्षम व पात्र शिक्षिकांची समस्या सोडविण्यासाठी मध्यप्रांताच्या संचालकांनी जास्तीत जास्त सहायक निरीक्षिकांची नियुक्ती करण्याचा उपाय सुचविला कि जेणे करून अल्प शिक्षित शिक्षिकांपासून होणारे दुष्परिणाम टाळता येतील(11).

### *शाळेची इमारत :–*

इंग्रज शासनाद्वारे मुलींच्या शाळांसाठी जास्तीत जास्त सुविधा पुरविण्यात आल्या. शासनाद्वारे वेळोवेळी शाळेच्या इमारतीची योजना व बांधकामाच्या खर्चाच्या अंदाज पत्रकाला मान्यता देण्यात आली होती. 22 ऑगस्ट 1890 रोजी एलिचपूर जिल्ह्याचा कमिश्नर जे. प्लाऊडन याने एलिचपूर येथे हिंदू व मुस्लीम मुलींची शाळा बांधण्यासाठी इमारतीची योजना व बांधकामाचा खर्च अंदाजे 3833 रू. याची मागणी शासनाकडे केली व त्याची ही मागणी मान्य करण्यात येऊन इमारतीच्या बांधकामासाठी अनुदान देण्यात आले(12).

### *अनुदान :–*

विदर्भातील स्त्री शिक्षणाची स्थिती अत्यंत दयनीय असल्यामुळे या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त अशा उपाययोजनांची गरज होती. मुलींच्या शिक्षणातील अडचणींचा विचार करून मुलींच्या शाळांना

अनुदान देण्यासाठी असलेल्या अटी अधिकाधिक सोप्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. समाजातील गरीब वर्गातील मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या शाळांना उदार हस्ते अनुदान देण्यात आले. मुलांच्या तुलनेत मुलींच्या शाळा चालविणे जास्त खर्चाचे होते. त्याचे कारण म्हणजे मुलींकडून शिक्षणशुल्क घेतल्या जात नसे. मुलींना त्यांच्या घरून शाळेत आणावे लागे आणि त्यांची उपस्थिती ही कमी होती. या कारणांमुळे मुलींच्या शाळा खर्च चालविण्यास असमर्थ ठरत. त्यामुळे त्यांना मुलांच्या शाळेपेक्षा जास्त अनुदान देणे गरजेचे होते. सामान्य अनुदानाबरोबरच काही विशेष अनुदान ही दिले जात असे जसे इमारत अनुदान, सामग्री खरेदीसाठी अनुदान, वेतन अनुदान इ. स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका व शासनाद्वारे चालविण्यात येणाऱ्या मुलींच्या शाळांना सार्वजनिक निधीतून अर्थसहाय्य केले जात असे. इस 1892–93 मध्ये नागपूरातील सिटी गर्ल्स्‌ला 100 रू. सिटी कॉन्व्हेंट गर्ल्स्‌ला 100 रू. सीताबर्डी गर्ल्स्‌ला 120 रू., सेंट जोसेफ कॉन्व्हेंटला 240 रू., अंजुमन इस्लामला 360 रू. याप्रमाणे खाजगी शाळांना नागपूर नगरपालिकेने अनुदान दिले होते (13).

***शिक्षणशुल्क :–***

शिक्षण घेणाऱ्यांनी शिक्षणशुल्क द्यावे, हा सामान्य नियम शासनाने स्वीकारला होता. मुलींच्या बाबतीत विचार केल्यास समाजात आधी मुलींच्या शिक्षणासाठी आवड निर्माण करणे गरजेचे होते. त्यामुळे मुलींकडून शिक्षणशुल्क घेतलेच पाहिजे, अशी शासनाची अट नव्हती. नगरपालिका किंवा जिल्हा येथील शाळेतील मुलींचे पालक शुल्क देण्यास असमर्थ असल्यास त्यांना शुल्क माफ करण्यात येत असे.

इंग्रजांद्वारे स्त्री शिक्षणाच्या विस्तारासाठी करण्यात आलेल्या उपायोजना इंग्रजांना स्त्री शिक्षणविषयक धोरण राबवितांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. त्या अडचणींतून मार्ग काढीत त्यावर उपाययोजना राबवित इंग्रजांनी आपले कार्य सुरू ठेवले जसेमुलींसाठी नवीन शाळा उघडणेएमुलींच्या शाळांचे हस्तांतरणए अभ्यासक्रमात बदलए वसतिगृहांची स्थापनाएस्त्री शिक्षिकांनी नियुक्तीएस्त्रियांना प्रशिक्षण देण्यासाठी नॉर्मल स्कूलची सीापना , स्त्री निरीक्षिकांची नियुक्ती , शिष्यवृत्त्या व मानधनात वाढइ.

***इंग्रजी शासनांतर्गतविदर्भातील स्त्री शिक्षणाचा झालेला विकास***

विदर्भातील इंग्रजांच्या आगमानानंतरच खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाची सुरवात झाली. स्त्री शिक्षण हा तत्कालीन समाजात एक दुर्लक्षित विषय होता. सामाजिक चालीरिती व रूढी या स्त्रियांना शिक्षणापासून वंचित करीत होत्या. परंतु इंग्रज ज्या–ज्या भागात स्थिरावले त्या त्या भागात त्यांनी विविध राजकीय व सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. इंग्रजांच्या प्रारंभिक प्रयत्नांमुळे विदर्भातील स्त्रिया या शाळेत पोहचू लागल्या. भारतातील इतर भागांप्रमाणेच विदर्भातही स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करीत असतांना इंग्रजांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

मुलींसाठी स्वतंत्र शाळा उघडण्याऐवजी सुरवातीस मुलांच्याच शाळेत मुलींना शिकण्यासाठी पाठविण्यास इंग्रजांद्वारे पालकांना प्रोत्साहन देण्यात आले. इस 1887–1892 च्या दरम्यान साधारणपणे प्राथमिक शाळेत मुलींची संख्या वाढण्यास सुरवात झाली होती. यावेळी फक्त प्राथमिक शाळेतच मुली शिकावयास येण्यास सुरवात झाली होती; परंतु माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणात स्त्रियांचा प्रवेश अजून व्हावयाचा होता.

हिंदू व मुसलमान दोन्ही समाजातील मुली हळुहळु शाळेत येण्यास सुरवात झाली होती. साधारणपणे इस 1911 पर्यंत शासन, काही स्थानिक संस्था व खाजगी संस्था यांच्या प्रयत्नांमुळे उच्च भारतीय अधिकारी आणि समाजातील उच्च वर्णिय लोक यांनी आपल्या मुलींना शाळेत पाठविण्यास किंवा घरीच शिक्षण देण्यास प्रारंभ केला होता. प्राथमिक शाळेत मुलींची संख्या वाढण्यास सुरवात झाल्यानंतर शासनाद्वारे मुलींच्या स्वतंत्र शाळा काढावयास प्रारंभ झाला. शासकीय मुलींच्या शाळेची व्यवस्था, स्त्री शिक्षिकांची नियुक्ती, त्यांचे प्रशिक्षण, शिष्यवृत्त्या, वसतिगृह इ. सोय शासनाकडून करण्यात येत असे.

सामाजिक विरोध इंग्रजांना ओढवून घ्यावयाचा नव्हता. म्हणून त्यांनी स्थानिक लोकांची इच्छा व पाठिंबा असल्यावरच स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. हळुहळु मुलींची संख्या वाढावयास सुरवात झाल्यानंतर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा विविध स्तरांवर शिक्षण देणाऱ्या शाळा काढावयास इंग्रजांनी सुरवात केली. भारतातील इतर प्रांताप्रमाणेच सामाजिक सुधारणेचे व राष्ट्रवादाचे वारे विदर्भात वाहण्यास सुरवात झाल्यानंतर ह्या भागात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाणही वाढले.

***संदर्भ***

1. Dr. Shabbir, S.History of Educational Development in Vidarbha(1882-1923),New Delhi : Northen Book Centre, 2005, page 03.
2. Dodwell, H. H.The Cambridge History of India, Vol VI. Delhi : S. Chand & Co., 1958, page 166-167.

3. Narulla, S. & Naik, J. P.History of Education in India, 2nd Ed. Bombay : Macmillan & Co. Ltd., 1951, Page 230.
4. Urdhawareshe, P. W.History of Nagpur University-1923-1975,Nagpur : Nagpur University, 1975, Page 06-07.
5. File No. 125 E. s.l. : Madhya Pradesh Record Room, 1883-84, page 44.
6. डॉ. वक्काणी, नि.आ., आधुनिक विदर्भाचा इतिहास, प्रथमावृत्ती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2003 पृष्ठ 02
7. Dr. Shabbir, S.History of Educational Development in Vidarbha(1882-1923), page 18
8.Ibid, page 18
9. Report of C. P. Provincial Committee, 1917-22, National Archives, New Delhi, page 61
10. Education Proceedings, Index 35 . s.l. : Home Department, Govt. Of India, Oct. 1884.
11. Fifth Quinquennial Review of the Progress of Education in India, Vol II, Page 259-260
12. File No. 1002, Education Department, Vidarbha Archive, Nagpur.
13.डॉ. जोशी, प. ल. देशमुख म. कृ; नागपूर नगरसंस्था शताब्दि ग्रंथए खंड तीन, नागपूर महानगरपालिका प्रेस, नागपूर1964,, पृष्ठ 131

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net